आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. ८०लगत जोड

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – नागेंद्र कुमार पंडा

वय – ५७ वर्षे, व्यवसाय – असिसटन्ट जनरल मॅनेजर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, हेड ऑफिस मुंबई,

राहणार–ठाणे, नवी मुंबई.

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.११ यांचा उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः</u>**

मी सांगु शकत नाही तथाकथीत पैशाचा अपहार हा गौतम जाधवच्या सीएससी आयडी वरुन झाला आहे की वडझिरे शाखेतुन झाला आहे. फिर्याद दाखल करण्यापुर्वी मी वडझिरे शाखेच्या ब्रांच मॅनेजर कडुन सदर घटनेबाबत चौकशी केली नाही.

प्रश्न– तथाकथीत पैशाचा अपहार हा आरोपीचा सीएसीसी आयडीवरुन झाला किंवा वडझिरे शाखेतुन झाला यांचे उत्तर नेमके कोणता व्यक्ती देऊ शकतो?

उत्तर– जर ब्रांच मॅनेजरला त्या संदर्भात माहिती असेल तर तो त्याचे उत्तर देऊ शकतो.

तथाकथीत पैशाचा अपहार गौतम जाधव यास दिलेल्या बँकेच्या कोड मधुन झाला होता का स्टाफच्या आयडी वरुन झाला होता यांची मला कल्पना नाही.

प्रश्न– फिर्याद दाखल करण्यापुर्वी तुम्ही ब्रांच ने केलेल्या स्पेशल ऑडीटचे अवलोकन केले होते का?

उत्तर– स्पेशल ऑडीटबाबत मला कल्पना नाही.

प्रश्न– जर तुम्हाला कल्पना नाही की कोणत्या आयडी वरुन पैशाचा अपहार झाला व तुम्हाला स्पेशल ऑडीट बाबत कल्पना नाही तर तुम्ही केवळ गौतम जाधव विरुध्द का फिर्याद दाखल केली?

उत्तर– ज्या काही तक्रारी माझ्याकडे आल्या होत्या त्या तक्रारींमध्ये गौतम जाधव याने पैसे अपहार केलाचा स्पष्ट उल्लेख होता. त्यामुळे फिर्याद दाखल केली.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या कडे आलेल्या तक्रारी अर्जाचे मी अवलोकन करुन केवळ त्या आधारेच गौतम जाधव विरुध्द फिर्याद दिली.

प्रश्न– गौतम जाधव यांच्या विरुधच फिर्याद दाखल करायला तुम्हाला काय कारण घडले?
उत्तर– आलेल्या तक्रारीवरुन प्राथमिक चौकशी केली होती व त्या प्राथमिक चौकशी वरुन गौतम जाधव यांनेच अपहार केल्याबाबत दिसले त्यामुळे गौतम जाधव विरुध्द फिर्याद दिली.

हे माझ्या लक्षात नाही की प्राथमिक चौकशी मध्ये पैशाचा अपहार हा बँक स्टाफच्या आयडीवरुन झाला कि गौतम जाधवच्या आयडी वरुन झाला याबाबत नमुद आहे कि नाही.

प्रश्न– बँक मित्राला CBS system चालविण्याबाबत ट्रेनिंग दिली जाती का?
उत्तर– लिमिटेड अॅक्सेस मध्ये बँक मित्राला ते system चालविण्याबाबत ट्रेनिंग दिली जाते.

लिमिटेड अॅक्सेस बँक मित्राला काय दिले जाते याबाबत मला कल्पना नाही. ती ट्रेनिंग कुठे दिली जाते मी निश्चित सांगु शकत नाही. हे मी सांगु शकत नाही की CBS system ट्रेनिंगसाठी बँकच बँक मित्राला पाठविते का कोणी त्रयस्थ पार्टी बँक मित्राला पाठवते.

प्रश्न– तुम्ही रिजनल मॅनेजर असुन तुम्हाला CBS system ट्रेनिंग कुठे दिली जाते व बँक मित्राला ट्रेंनिगसाठी कोण पाठवित हे माहित नसल्याचे सांगतात तर ही माहिती लेखी द्यायला तयार आहेत का?
उत्तर– मी आता एक्स ऑफिशीओ रिजनल मॅनेजर आहे व सदरचे कार्यक्षेत्र आता माझ्याकडे नाही.

रिजनल मॅनेजर असताना मी प्रकाश बोरुडे, भुषण संके व विद्या उघडे यांना गौतम जाधव हा बँकेत बसुन काम करुन शकतो असा आदेश मी दिला नव्हता. प्रकाश बोरुडे, भुषण संके व विद्या उघडे यांनी गौतम जाधव बँकमध्ये बसुन काम करु शकतो याबाबत माझ्याकडे अर्ज दिला नव्हता.

प्रश्न– बँकेत सरप्राईज विझीट करणे म्हणजे नेमके काय?
उत्तर– अचानक पणे बँकेत जाऊन पाहणे की बँक नियमाप्रमाणे काम करीत आहे की नाही म्हणजेच सरप्राईज विझीट असते.

हे म्हणणे खरे आहे की सरप्राईज विझीट करताना बँक अधिका–यांना कळविले

जात नाही.

प्रश्न– सरप्राईज विझीट बँकेत बँक नियमाप्रमाणे काम करीत आहे की नाही व दैनंदिन कामामध्ये काही अनियमितता आढळुन येत आहे की नाही हे पाहण्यासाठी कंडक्ट करणे गरजेचे असते?

उत्तर– सरप्राईज विझीट करताना बँकेत अनियमितता आहे हे अगोदर कळत नाही. सरप्राईज विझीट चा हेतू हा बँकेचे कामकाज कसे चालू आहे हे पाहण्यासाठी असते.

हे म्हणणे खरे नाही की सरप्राईज विझीट मध्ये बँकेतील रजिस्टर व व्हाउचर तपासले जातात.

प्रश्न– सरप्राईज विझीट मध्ये काय पाहिजे जाते?

उत्तर– बँकेचा बोर्ड आहे की नाही, एटीएम मशीन निट आहे की नाही, लोक ठिक बसले आहे की नाही तसेच आरबीआयचे गाईडलाईनस व लोकपालबाबत माहिती दर्शविली आहे की नाही हे माहिले जाते.

प्रश्न– बँकेत अनियमितता किंवा बेकायदेशीर व्यवहार काय असला तर तो वार्षीक ऑडीट मध्ये निष्पन्न होतो का?

उत्तर– नियमीत ऑडीट झाल्यानंतर काही अनियमितता आढळली तर त्यांची चौकशी करतात किंवा गरज पडली तर स्पेशल ऑडीट करतात.

हे माझ्या लक्षात नाही की फिर्याद दाखल करण्यापूर्वी व तक्रारी अर्ज येण्यापूर्वी फिक्स डिपॉझीट पावत्या मिसींग असल्याबाबत किंवा चोरी झाल्याबाबत ब्रांच मॅनेजर मला सांगितले होते की नाही. मी रिजनल मॅनेजर असताना बँकेत बँक स्टॅम्प किंवा एफडी रिसीप्ट किंवा काही कागदपत्र मिसींग झाल्याबाबत ब्रांच मॅनेजर ने पोलीसांना कळवल्याबाबत मला कल्पना नाही.

प्रश्न– एफडी पावती किंवा बँक स्टॅम्प मिसींग झाल्याबाबत ब्रांच मॅनेजरला त्यांच्या वरिष्ठांना कळवणे अनिवार्य असते का?

उत्तर– नाही.

जर एफडी रिसीप्ट किंवा बँक स्टॅम्प गहाळ झाले तर ब्रांच मॅनेजरने काय करावे याबाबत मला सांगत येणार नाही. फिर्याद दाखल करण्यापूर्वी किती वेळा वडझिरे शाखेत सरप्राईज विझीट झाली याबाबत मी ब्रांच मॅनेजरकडे चौकशी केली नाही. मी बँकेचा वरिष्ठ

अधिकारी असतांना फिर्याद दाखल करण्यापूर्वी वडझिरे शाखेतील बँकेचा सन २०१८, २०१९, २०२० आणि २०२१ सालाचा ऑडीट रिपोर्ट पाहिला नव्हता.

प्रश्न– तक्रारदाराचे तुम्हाला अर्ज आल्यावर तुम्हाला सन २०१८, २०१९, २०२० आणि २०२१ सालाचे ऑडीट रिपोर्ट पाहण्याची गरज पडली नाही का?

उत्तर– नाही.

फिर्याद दाखल झाल्यानंतर वडझिरे शाखेत मी रिजनल मॅनेजर म्हणुन एकद्याही भेट दिली नाही. फिर्याद दाखल करण्यापूर्वी रिजनल मॅनेजर म्हणुन मी वडझिरे शाखेत एकदा भेट दिली होती. कोणता साली भेट दिली हे लक्षात नाही मात्र त्यावेळी ब्रांच मॅनेजर श्री.गजभीए होते. ज्यावेळी मी वडझिरे शाखेत भेट दिली होती त्यावेळी काही अनियमितता आढळुन आली होती की नाही हे मी सांगु शकत नाही.

प्रश्न– तुम्ही रिजनल मॅनेजर असताना प्रकाश बोरुड यांना संस्पेड केले होते का?

उत्तर– हे मला लक्षात नाही.

प्रकाश बोरुड संस्पेड होता हे मला लक्षात नाही. आता मला दि.२६/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ या कालावधीमधील केलेला स्पेशल ऑडीट रिपोर्टची प्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की एकुण स्टाफचा पट ८ असनु एक क्लर्क अडर संस्पेशन असल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की २६/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ या कलावधीमध्ये मी रिजनल मॅनेजर होतो. हे मी सांगु शकत नाही की अडर संस्पेशन मध्ये नमुद असलेला एक क्लर्क प्रकाश बोरुडेच होता. सदर स्पेशल ऑडीच्या रिपोर्टच्या प्रतीस **ओळखीसाठी नि.९५** देण्यात येते.

प्रश्न– स्पेशल ऑडीट रिपोर्टच्या पान क्र.३ वर पाहणी करण्यात आलेल्या मुद्दयामध्ये मुद्दा क्र.२ मध्ये गौतम जाधव यांना ऑक्टोबर २०२० मध्ये टरमिनेंट केल्याबाबत उल्लेख आहे तर गौतम जाधव यांना ऑक्टोबर २०२० मध्ये टरमिनेंट केल्याबाबत तुम्हाला माहित आहे का?

उत्तर– मला माहित नाही.

हे म्हणणे खरे आहे की स्पेशल ऑडीट रिपोर्टच्या पान क्र.३ वर मुद्दा क्र.६ मध्ये बरीच व्हाउचर आणि व रेकॉर्ड वादातीत व्यवहाराच्या पडताळणीसाठी मिसींग आहे किंवा उपलब्ध नाही.

आता मला स्पेशल ऑडीट रिपोटच्या पान क्र.१६ वर मुद्दा क्र.४ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की त्यामध्ये "*As per complaint customer, Rs.1,50,000/- was transferred for his saving account to overdraft account No.3635964327 of Mr. Gautam Jadhav on 22/07/2020. We have verified vouchers dated 22/07/2020 and it is observed that the said transaction is carried out by preparing internal transfer credit and debit voucher without any mandate from customer. On inquiry with existing staff of branch regarding said transaction and handwriting they identify of Mr. Sanke, then branch manager*". असे त्यामध्ये नमुद आहे.

**(सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला की सदर साक्षीदार यांने स्पेशल ऑडीट केलेले नाही त्या संदर्भी प्रश्न साक्षीदारास विचारात येणार नाही. आरोपीतर्फे वकीलांनी सांगितले की सदर केसमधील वादाचा मुद्दा हस्ताक्षराबाबत असुन इतर व्यक्तीना सोडून केवळ आरोपीला या केसमध्ये आणले आहे. त्यामुळे सदर प्रश्न विचारणे गरजेचे आहे. दोन्ही बाजुने घेतलेला आक्षेप व उत्तर पाहता स्पेशल ऑडीट रिपोर्टला ओळखीसाठी निशाणी देणात आली होती सदर साक्षीदार हा फिर्यादी असल्याने व उलटतपासात साक्षीदारास तो रिपोर्ट जो चार्जशीट मध्ये दाखल आहे तोच रेफर केला असल्याने त्याबाबत प्रश्न विचारता येणार नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे उलटतपासाचे स्वरुप पाहता सदर साक्षीदारास प्रश्न विचारणाची परवानगी देण्यात येत आहे.)**

प्रश्न– तुम्हाला स्पेशल ऑडीटरने काही व्हाउचरवर श्री. संके यांचे हस्ताक्षर आहे याबाबत माहिती दिली होती का?

उत्तर– मला माहिती दिली नव्हती.

प्रश्न– स्पेशल ऑडीट रिपोर्ट मध्ये संके व बोरुडे व इतर कर्मचा–यांच्या आयडी वापरल्याबाबत उल्लेख असुन तुम्ही संके, बोरडे यांच्या विरुध्द फिर्याद का दाखल केल नाही?

उत्तर– स्पेशल ऑडीट मी फिर्याद दाखल केल्यानंतर झाले होते. स्पेशल ऑडीटचा रिपोर्ट त्यानंतर आला होता तसेच ऑडीट आणि इनस्पेशन डिपार्टमेंट यामध्ये कोणताही प्रशासकीय हस्तक्षेप नसतो व जी अनियमीतता असते त्यामधुन ती दुरुस्ती केली जाते.

हे म्हणणे खरे आहे की ०१/०४/२०२१ रोजी मी माझा पुरवणी जबाब दिला होता.

प्रश्न– तुम्ही पुरवणी जबाबा ०१/०४/२०२१ रोजी दिला व ऑडीटचा कालवधी २६/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ होता तर तुम्ही तुम्हाला माहित असुनही पुरवणी जबाबात तुमच्या बँक अधिका–यांचे नावे का घेतली नाही?

उत्तर– स्पेशल ऑडीट २६/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ मध्ये झाला मात्र त्यांचा रिपोर्ट नंतर आला होता.

प्रश्न– तुम्हाला प्राप्त झालेल्या खातेदारांच्या तक्रारी अर्जामध्ये ब्रांच मॅनेजर, कॅशियर व क्लर्क यांच्या विरोधात तक्रारी होत्या व स्पेशल ऑडीट रिपोर्ट आल्यावर बँक अधिका–यांची नावे त्यामध्ये आली होती तरीही तुम्ही ऑडीट संपल्यावर बँक अधिका–यांविरुध्द तक्रार का केली नाही?

उत्तर– स्पेशल ऑडीट रिपोर्ट बाबत मला कल्पना नव्हती.

प्रश्न– खातेदाराकडून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये मॅनेजर उघडे, कॅशियर बोरुडे व क्लर्क यांच्या विरोधात तक्रारी असताना तुम्ही केवळ आरोपी विरुध्द फिर्याद का दाखल केली?

उत्तर– सर्व तक्रारी अर्जामध्ये आरोपी गौतम जाधव विरुध्द तक्रारी होती व तपास हा पोलीसांनी करायचा होता.

प्रकाश बोरुडे यांचे संस्पेशन चालु असताना त्या अगोदर पण त्याला एकदा संस्पेड केले होते का याबाबत मला माहिती नाही. प्रकाश बोरुडे व उघडे मॅडम विरुध्द तक्रारी आल्याबाबत प्रकाश बोरुडचे सी.आरची मी पडताळणी केली नव्हती. सदर घटना घडल्यानंतर मी रिजनल मॅनेजर असताना कोणत्या बँक कर्मचा–यांविरुध्द मी संस्पेशनची कार्यवाही केली होती का हे मला लक्षात नाही. फिर्याद दाखल झाल्यानंतर व तक्रारी अर्ज माझ्याकडे आल्यानंतर मी कोणत्या कर्मचा–यांची बदली केली की नाही याबाबत माझ्या लक्षात नाही.

चालु नसलेल्या खात्याल्या चालु करण्याची काय प्रक्रिया आहे याबाबत मला कल्पना नाही.

**<u>उलटतपास मध्यान्हपर्यंत तहकुब.</u>**

**उलटतपास मध्यान्हानंतर शपथेवर पुन्हा सुरुः**

आता मला दि.०६/०३/२०२१ रोजीचा अशोक काटारिया यांचा तक्रारी अर्जाची झेरॉक्स दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की त्या अर्जात गौतम जाधव यांच्या नावाचा उल्लेख नाही. सदर अर्जाच्या प्रतीस **ओळखीसाठी नि.९६** देण्यात येते.

प्रश्न– तुमच्या पुरवणी जबाबत अशोक काटारिया यांने तक्रारी अर्ज दिल्याचे संदर्भ असुन त्याबाबत तुम्ही स्पेशल ऑडीट रिपोर्ट व प्रिलिमनरी इंक्वायरी रिपोर्ट अवलोकन केले होते का

उत्तर– तो पर्यंत स्पेशल ऑडीट रिपोर्ट आला नव्हता व प्रिलिमनरी इंक्वायरी रिपोर्ट मी पाहिला होता.

अशोक काटारियाचे १,००,०००/– रुपये त्यास परत दिले का हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधवने खोटी फिक्स डिपॉझीट पावती तयार करुन त्यावर स्वतःचे पत्नीचे बचत खाताचा नंबर लिहिला असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की रुपाली जाधव यांचा सेव्हींग्ज अकाउंट नंबर कोणत्याच खातेदाराच्या एफडी पावत्यावर नमुद केलेला नाही. मला रुपाली जाधव यांच्या सेव्हींग्ज अकाउंट नंबर माहित नाही.

प्रश्न– मग तुम्हाला कसे कळाले की लिहिलेला बचत खाते नंबर रुपाली जाधवचा आहे?

उत्तर– प्रिलिमनरी इनक्यारी रिपोर्टच्या आधारे कळाले.

दि.२३/१०/२०२० रोजी गौतम जाधव यांने भुषण संकेकडे त्यांच्या राजीनामा दिल्याचे मला माहित नाही. भुषण संके यांने गौतम जाधव यांने दि. २३/१०/२०२० रोजी राजीनामा दिल्याबाबत मला सांगितल्याचे आठवत नाही. आता मला गोरक्ष अनाजी खोसे यांच्या तक्रारी अर्जाची प्रत दाखविण्यात आली.

प्रश्न– त्या अर्जामध्ये विषय म्हणुन सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा वडझिरे या बँकेमधील अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने अपहार करुन तक्रारदार यांची घोर आर्थिक फसवणुक केल्यामुळे संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत असे नमुद केले आहे तर तुम्ही त्या विषयाबाबत काही कार्यवाही केली का?

उत्तर– त्या अर्जाबाबत मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की दि.०१/०४/२०२१ रोजी मी पुरवणी जबाब दिला होता.

प्रश्न– तुमच्या पुरवणी जबाबातील परिच्छेद नं.९ मध्ये गौतम जाधवने स्वतःच कॅशियरची सही केली असे नमुद असुन व गोरक्ष खोसे च्या तक्रारी अर्जामध्ये गोरक्ष यांनी कॅशियरने पावतीवर सही केली असे नमुद आहे मग तुम्ही तुमच्या पुरवणी जबाबात गौतम जाधवने

स्वतः कॅशियर म्हणुन सही केली असे का सांगितले? (सदर साक्षीदारास गोरक्ष खोसेची तक्रारी प्रत दाखविण्यात आली त्यास **नि.९७** देण्यात आली)

उत्तर– चौकशी केल्यावरुन दिसले असेल की पावती वरील सही गौतम जाधवची असेल.

आता मला नि.९७ वरील अर्जामध्ये अधोरेखांकीत भाग अ वाचुन दाखविण्यात आला.

प्रश्न– तो अधोरेखांकीत भाग अ मधील मजकुर खरा आहे का?

उत्तर– हे मी सांगु शकत नाही.

प्रश्न– नि. ९७ वरील अर्जामध्ये गोरक्ष खोसे यांनी उघडे, कॅशीयर व इतर कर्मचा–यांविरुध्द फसवणुकीचे आरोप केलेले असताना सुध्दा तुम्ही केवळ गौतम जाधव यालाच आरोपी का केले व इतरांना आरोपी का केले नाही?

उत्तर– एक दोन अर्ज वगळता सर्व अर्जामध्ये गौतम जाधवचे नाव होते व खातेदारांचे हित जपण्यासाठी संरक्षित करण्यासाठी आरोपीविरुध्द फिर्याद दिली व बॅंक कर्मचा–यांबाबत इंटरनल डिसीप्लीनरी अॅक्शन घेतली जाते ती घेतली गेली असेल.

प्रश्न– बॅंक अधिका–यांन विरुध्द तुम्हाला फिर्याद दाखल करता येत नाही का?

उत्तर– जी डिसीप्लीनरी इन्क्वायरी होत असते त्यामधून जर काही आढळले तर बॅंक फिर्याद दाखल करण्याचा निर्णय घेवू शकते.

प्रश्न– नि. ९७ वरील गोरक्ष खोसे चा अर्ज फिर्यादी दाखल करण्यापूर्वी आला असताना त्या अर्जामध्ये बॅंक अधिका–यांविरुध्द आरोप केले असताना सुध्दा तुम्ही केवळ गौतम जाधव विरुध्द फिर्याद दिली याबाबत तुम्हाला एकाद्याही वाटले नाही का की बॅंक अधिका–यांच्या बाबतची डिसील्पीनरी इन्क्वायरीचा रिपोर्ट आल्यावर बॅंक अधिका–यांविरुध्द फिर्याद दाखल करावी?

उत्तर– नाही वाटले. मी सांगतो की डिसीप्लीनरी इन्क्वायरीचा रिपोर्ट पुर्ण झाला नव्हता फिर्याद दाखल करताना प्रिलिमनरी इन्क्वायरीचा रिपोर्ट पोलीसांना दिल्याचे माझ्या लक्षात नाही.

प्रश्न– प्रिलिमनरी इन्क्वायरीचा रिपोर्ट तुम्ही पुढच्या तारखेस दाखल करायला तयार आहात का?

उत्तर– आता माझ्याकडे चार्ज नाही. दुसरा व्यक्ती आता कार्यभार सांभाळतात.

हे म्हणणे खरे नाही की गोरक्ष यांनी माझ्या समोर कॅशियर बोरुडे, मॅनेजर उघडे,

क्लर्क व इतर अधिकारी व कर्मचा–यांविरुध्द फसवणुकीचे आरोप केले असताना व तसेच गोरक्ष खोसे यांनी तेच आरोप त्यांच्या पोलीसांसमोरील आरोपात केले असताना सुध्दा मी कॅशियर बोरुडे, मॅनेजर उघडे, क्लर्क व कर्मचारी यांना आरोपी केले नाही.

हे म्हणणे खरे नाही की अधिका–यांच्या युनियनच्या दबावापोटी व भितीपोटी मी बँक अधिका–यांना वाचवले आहे. आता मला पंढरीनाथ लंके यांचा दि.०८/०३/२०२१ रोजीचा तक्रारी अर्ज दाखविण्यात आला.

प्रश्न– तो तक्रारी अर्ज तुमच्याकडे आला होता.

उत्तर– हे माझ्या लक्षात नाही.

सदर अर्जास **ओळखीसाठी नि.९८** देण्यात येते.

प्रश्न– नि.९८ वरील तक्रारी अर्जामध्ये मॅनेजर उघडे, कॅशियर बोरुडे, सोनाली जाधव यांच्या विरोधात आरोप केलेले असुन तुम्ही त्यांच्या विरुध्द फिर्याद का दिली नाही?

उत्तर– सर्व अर्ज गौतम जाधव यांच्या विरोधात होते व बँक कर्मचा–यांबाबत इंटरनल डिसीप्लीनरी अॅक्शन घेतली जाते व त्या अंतर्गत दोषी आढळल्यास त्यांच्या विरोधात कार्यवाही होते.

ती कार्यवाही सेंट्रल बॅक ऑफ इंडिया इंटरनल डिसीप्लीनरी प्रोसिजर १९७६ अंतर्गत केली जाते.

प्रश्न– तुम्ही इंटरनल डिसीप्लीनरी इन्क्रायरी रिपोर्ट दाखल करायला तयार आहे का?

उत्तर– त्याबाबत अधिकृतरित्या विचारणा केली जाऊ शकते व ज्यांच्या आता कार्यभार आहे त्यांना विचारले जाऊ शकते.

हे म्हणणे खरे नाही की मी हेड ऑफीस मुंबई येथे असल्याने त्यामध्ये अहमदनगरचे कार्यक्षेत्र येते.

प्रश्न– हे म्हणणे बरोबर होईल का की केस संदर्भातील सर्व व्यवहार बँक कर्मचा–यांच्या आयडी वरुन झाले आहे?

उत्तर– होय.

हे मी सांगु शकत नाही की फिर्याद दाखल झाल्यानंतर ज्या खातेदारांचे पैसे अपहार झाल्याबाबत आरोप होते त्या खातेदाराचे पैसे बँकेने त्यांना दिले होते किंवा कसे.

प्रश्न– खातेदारांचे पैसे त्यांना मिळाले की नाही हे नेमके कोण सांगु शकते?

उत्तर– ते त्यावेळेसचे जनरल मॅनेजर सांगु शकता.

प्रश्न– स्पेशल ऑडीट रिपोर्ट मध्ये संके व इतर कर्मचा–यांचे एफडी पावत्या व व्हाउचर वर हस्ताक्षर असल्याचे नमुद आहे तर तुम्ही संके व इतर कर्मचा–यांविरुध्द फिर्याद का दाखल केली नाही?

उत्तर– सदर फिर्याद ही स्पेशल ऑडीट रिपोर्टच्या आधारे दाखल केलेली नव्हती.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "तिकोणे यांनी माझ्याकडे तक्रार दिली की त्यांनी दि.१६/१०/२०१९ रोजी त्यांच्या खात्यातून ३,००,०००/– व ५०,०००/– रुपयांची असे एकुण ३,५०,०००/– रुपये काढुन आरोपी गौतम जाधव यांच्याकडे फिक्स डिपॉजिट करण्यासाठी दिले होते", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "गौतम जाधवने खोटी फिक्स डिपॉजिट पावती तयार करुन त्यावर स्वतःच्या पत्नीचे बचत खात्याचा नंबर लिहिला होते", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "त्यानंतर माझ्याकडे शिवाजी बाबुराव साठे यांचा तक्रारी अर्ज आला होता. तो अर्ज दि.०६/०३/२०२१ रोजीचा आहे. शिवाजी साठे यांनी आरोपी गौतम जाधव यांच्या कडे २,७५,०००/– रुपयाची एफडीची पावती इनकॅशमेंट साठी दिली होती मात्र गौतम जाधवने साठे यांच्या खात्यात ती रक्कम न भरता आरोपीने स्वतःच्या खात्यात ती रक्कम भरली", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "चौधरी यांचा खाते क्र.३१०२३६६५३८ असा होता. त्यांची तक्रार होती की गौतम जाधवे यांने त्यांच्याकडून दोन प्रत्येकी १,००,०००/– रुपयांच्या विथड्रॉल स्लीप वर सहया करुन घेतल्या होत्या. त्यांचे सहया दि.२८/०१/२०२१ रोजी घेतल्या होत्या", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "गौतम जाधवने त्यांच्या खाता क्र.३३०७७९४८९० या खात्यावर सदर २,००,०००/–रुपये जमा करुन घेतले होते. मी खाता उतारा पाहुन सांगतो की दि.२८/०१/२०२१ रोजी ती रक्कम खात्यावर भरुन घेतली होती", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "गौतम जाधवने त्यांच्या खाता क्र.३३०७७९४८९० या खात्यावर सदर २,००,०००/–रुपये जमा करुन घेतले होते. मी खाता उतारा पाहुन सांगतो की दि.२८/०१/२०२१ रोजी ती रक्कम खात्यावर

भरुन घेतली होती. त्यानंतर माझ्याकडे प्रमिला जयसिंग शेडकर यांचा तक्रारी अर्ज मार्च २०२१ मध्ये आला होता की त्यांनी गौतम जाधव यांना त्यांच्या खाता क्र.४०४३२६८३०२ ची १,००,०००/- रुपयाची विथड्रॉ स्लीप दिली होती. गौतम जाधव यांनी ती रक्कम त्यांच्या खाते क्र.३३०७७९४८९० वर दि.०८/०२/२०२१ रोजी जमा केली होती. तो तक्रारी अर्ज मला दाखविण्यात आला तो तोच अर्ज असुन तो नि.६८ वर आहे ", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "त्यानंतर सदर गुन्हयाबाबत बातमी पसरल्यानंतर माझ्याकडे खातेदारांचे ११ पुरवणी अर्ज एप्रिल २०२२ मध्ये आले होते व ती मी तपासाकामी तपासी अधिकारी यांना दिले होते. त्यामध्ये पांडुरंग मेहेत्रे यांचा तक्रारी अर्ज माझ्याकडे आला होता. तो अर्ज दि.१०/०३/२०२१ रोजी आला होता. मी पाहुन सांगतो की नि.६० वर मेहेत्रे यांचा तक्रारी अर्ज आला होता की त्यांनी १,००,०००/- व २,००,०००/- रुपयांच्या अशा दोन विथड्रॉ स्लीप गौतम जाधव यांना दिल्या होत्या व गौतम जाधवने ती रक्कम त्यांच्या स्वतःच्या खाते क्र.३३०७७९४८९० यावर जमा केली होती ", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "त्यानंतर माझ्याकडे अक्षय तोडकर यांचा तक्रारी अर्ज आला होता. मी पाहुन सांगतो की त्यांनी गौतम जाधव यांना १,००,०००/- रुपये विथड्रॉल स्लीपद्वारे एफडी करण्यासाठी दि.१६/०२/२०२१ रोजी दिले होते. गौतम जाधवने एफडी ची पावती तोडकर यांना न देता ती रक्कम स्वतःच्या खात्यात जमा केली", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "रंजना दत्तात्रय मोरे यांनी तक्रारी अर्ज दि.३०/०३/२०२१ रोजी दिला होता. मी पाहुन सांगतो की त्यांनी तक्रारी अर्जामध्ये त्यांना खोटी एफडी पावती दिली होती. ती बॅँकेत गेल्यावर तिला कळाले की तसे खाते बॅँकेत नव्हते. दत्तात्रय रामु मोरे यांची तक्रार आली होती. ती नि.६० वर असुन. त्यांची तक्रार होती की त्यांनी दि.०८/०१/२०२१ रोजी गौतम जाधव यांना २ लाख रुपयांची विथड्रॉल स्लीप दिली होती व आरोपीने ते पैसे त्यांच्या खात्यात जमा न करता स्वतःच्या खात्यात जमा केली", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "तुळशीराम मंजाबा सपकाळ यांची तक्रार आली होती. दि.०८/०३/२०२१ रोजीची ती तक्रार होती. मी पाहुन सांगतो की त्यांची तक्रार अशी होती की त्यांच्या खाते क्र. ३१५५६३६०४९ वरुन ४ ते ५ वेळा वेगवेगळया तारखेस व्यवहार झाले होते व ते पैसे गौतम जाधव च्या खात्यावर जमा झाले होते", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "शोभा वसंत शिर्के यांची तक्रार आली होती. मी पाहुन सांगतो की तक्रारीची तारीख दि.०९/०३/२०२१ रोजीची होती. मी पाहुन सांगतो की तिच्या खात्यावरुन वेगवेगळया तारखेस व्यवहारातले पैसे गौतम जाधवने त्यांच्या खात्यावर जमा केले होते. त्यानंतर सुखदेव भाऊ पवार नि.५३ वर तक्रार आली होती. मी पाहुन सांगतो की त्या तक्रारीची तारीख दि.३०/०३/२०२१ रोजीची होती. त्यांची तक्रार होती की त्यांनी विथड्रॉल स्लीप आरोपीस दिलेली असताना आरोपीने त्यांना खोटी एफडी रिसीप्ट दिली होती", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "पंढरीनाथ बागा लंके यांनी तक्रार दिली होती. मी पाहुन सांगतो की त्यांची तक्रार दि.०८/०३/२०२१ रोजीची होती. मी पाहुन सांगतो की त्यांनी १,००,०००/– रुपयांची विथड्रॉ स्लीप एफडी करण्यासाठी दिली असता आरोपीने त्यांच्या खात्यावर ती रक्कम जमा करुन घेतली होती", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "गोरख अणाजी खोसे यांची तक्रार आली होती. मी पाहुन सांगतो की गोरख खोसे यांनी तक्रार दिली होती त्यांनी आरोपीस १,५०,०००/– रुपये जमा करण्यासाठी दिले असता आरोपीने त्यांना १,५०,०००/– रुपये जमा झाल्याबाबत खोटी पावती दिली व ते १,५०,०००/– रुपये खोसे यांच्या खात्यावर जमा झाले नव्हते", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकुर की "मी पाहुन सांगतो की बाळासाहेब बेलोटे यांची तक्रार आली होती की त्यांना २,११,९००/– रुपयांची कॉउन्टर स्लीप दिली होती मात्र त्यांच्या खात्यावर तशी रक्कम जमा नव्हती. मी बँकेतर्फे अधिकृत अधिकारी असल्यामुळे दि.१९/०३/२०२१ रोजी मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्यादी व पुरवणी जबाब दाखविण्यात आला त्यामधील मजुकर बरोबर असुन फिर्याद नि.९२ देण्यात येते", हा मी खोटा सांगितला आहे.

हे म्हणणे खरे नाही की मी बँक कर्मचा–यांना वाचविण्यासाठी बँक मित्र बँकेत बसत नाही असे खोटे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की युनियन मला प्रेशर केले होते. हे म्हणणे खरे नाही की पैशाचा अपहार झाल्यानंतर वडझिरे गावात मोठे आंदोलन झाले व त्या आंदोलनच्या दबावापोटी कोणा विरुध्द केस करावी म्हणुन गौतम जाधव विरुध्द केस केली. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधव यांने काहीही फोरजरी केली नसताना, कोणालाही फसवले नसताना व कोणाचाही विश्वास घात केलेला नसताना व त्यांने कायदेशीररित्या काम करुनही युनियनच्या दबावापोटी मी त्यांच्या विरुध्द केस केली. हे

म्हणणे खरे नाही की माझ्याकडे आलेल्या सर्व तक्रारी अर्जामध्ये सोनाली जाधव, कॅशियर बोरूडे व मॅनेजर उघडे यांच्या विरुध्द तक्रारी असुनही केवळ त्यांना वाचविण्यासाठी मी गरीब घरातील मुलाला फसविले. हे म्हणणे खरे नाही की मी सर्व तक्रारदार खातेदारांना ऑफिस मध्ये बोलवुन त्यांना पैसे परत देण्याचे आश्वासन दिले व त्याबद्दल्यामध्ये सर्व तक्रारदार खातेदारांनी पोलीसांसमोरील जबाबात केवळ गौतम जाधवाचे नावे घेतले व इतर बँक कर्मचा–यांचे नाव घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही गौतम जाधवने ऑक्टोबर २०२० मध्ये राजीनामा दिल्यानंतर त्यानंतर झालेल्या व्यवहाराबाबतही गौतम जाधव यांचे नाव घेतले. हे म्हणणे खरे नाही की प्रकाश बोरुडे यांच्या विरुध्द अशा प्रकारची अपहाराबाबत इन्क्वायरी झालेली असतानाही व त्यांची इन्क्रीमेंट थांबविली असतानाही मी त्यास सोडून दिले. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधव यास बँक मित्र म्हणून बँकेत बसण्याच्या अधिकार नसताना व गावात काम करीत असताना सुध्दा त्याला फसविण्यासाठी मी खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधवचा बँक मित्र म्हणुन बँक अधिका–यांनी गैरवापर करुन त्याला फसविले. हे म्हणणे खरे नाही की बँकेतील सर्व व्यवहार बँक अधिका–यामार्फत झाले असताना केवळ बँक अधिका–यांविरुध्द कार्यवाही होऊ नये म्हणून मी चुकीच्या पध्दतीने गौतम जाधवला फसविले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या बँकेतील कार्यकीर्दीला बांधा येऊ नये व माझ्या प्रमोशनला बाधा येऊ नये म्हणुन मी बँक अधिका–यांविरुध्द काही फिर्याद दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की हे सर्व हेतू समजुन मी आरोपीविरुध्द ही खोटी केस केली.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०३/०६/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.